### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

### राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## NCC - यश बिचकर याची भारतीय नौसेनेत निवड

**राष्ट्रसंचार**

» Selected



### यश बिचकर याची भारतीय नौसेनेत निवड

**राजगुरूनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) विभागातील विद्यार्थी यश राजेंद्र बिचकर याची भारतीय नौसेना विभागात वर्ग २ अधिकारी पदावर नुकतीच निवड झाली. या यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एनसीसी प्रमुख डॉ. योगेश वाळुंज, सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी कु. यश व त्याच्या पालकांचे अभिनंदन केले. संस्थेच्या वतीने त्यांचा सहकुटुंब सत्कार केला. या वेळी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. बुट्टे यांनी यशची निवड महाविद्यालयासाठी अभिमानास्पद असून विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी आहे असे सांगून यशने देशसेवेच्या माध्यमातून आपले पालक, गाव, महाविद्यालय आणि तालुक्याचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.



## यश बिचकरची नौसेनेत निवड

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) विभागातील विद्यार्थी यश राजेंद्र बिचकर याची भारतीय नौसेना विभागात वर्ग २ अधिकारी या पदावर नुकतीच निवड झाली.

या यशाबद्दल खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी यशचे अभिनंदन केले. एनसीसीचे प्रमुख डॉ. योगेश वाळुंज यांनी सर्वांचे आभार मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख